पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित

# जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ

## मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षण विभाग

दूरध्वनी क्रमांक : ९०२२८१६०५८ ई-मेल : santpithschool@gmail.com

दिनांक - २८/०९/२०२४.

**विषय: जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ अंतर्गत सुरु केलेले मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षण विभाग मधील विद्यार्थ्यांस संगीत शिक्षण देणेकामी वाद्य खरेदीबाबत....**

प्रति,
मा.....................
.....................
.....................

### कोटेशन नोटीस क्र. ०२/२०२४ - २०२५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ अंतर्गत सुरु केलेले **मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षण विभागामधील** विद्यार्थ्यांस भारतीय संगीत शिक्षण देणेकामी वाद्य खरेदी करणे आवश्यक असल्याने भारतीय संगीत वाद्यांची खरेदी करणेकामी सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे....

| अ क्र. | साहित्याचा तपशील | स्पेसिफिकेशन | नग संख्या | सर्व करांसह दर नग/मीटर/फुट |
|---|---|---|---|---|
| १. | पखवाज | लाकूड - लाल खैर , उंची - २३ इंच, डेरा - ३४ इंच, शाईपूड - ७.१५ इंच, धूम - ८.४५ इंच, धुमापासून साईज - ८ इंच वर आणि स्वर - १ काळी | ०१ | |
| २. | हार्मोनियम | लाकूड - सागवान, सप्तक - ३.५, स्वर प्रकार - खर्जे नर, भाता - १ बाजूस | ०१ | |
| ३. | तबला हातोडी | साहित्य - पितळी | ०२ | |
| ४. | बाह्या (डग्गा) | साहित्य - पितळी , साईज - फुल, तोंडाचा आकार - ९ इंच वजन - ४ किलो आणि सुपारी घाट. | ०१ | |
| ५. | तबला | लाकूड - लाल खैर , उंची - ११ इंच, शाईपूड - ५.५ इंच, आणि स्वर - १ काळी | ०१ | |

**कोटेशन नोटीस व नियम अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. इच्छुक ठेकेदारांनी / पुरवठाधाराकांनी उपरोक्त नमूद केलेल्या कामाचे दर दिलेल्या स्पेशिफिकेशन नुसार व आवश्यक त्या कागदपत्रांसह सिलबंद पाकिटात मा. विभाग प्रमुख, मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षण विभाग, यांचे नावे दिनांक २८../०९/२०२४ ते ०४...../१०/२०२४ अखेर दुपारी ०३:०० वाजेपर्यंत जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ अंतर्गत सुरु केलेले मुक्त सांप्रदायिक संगीत शिक्षण विभाग, पाटीलनगर, टाळगाव चिखली, तालुका - हवेली, जिल्हा - पुणे ४११०६२ येथे सादर करावे.

२. पुरवठा धारकाने कोटेशन सोबत शॉप ॲक्ट नोंदणी दाखला, उद्योम आधार, पॅनकार्ड व जी.एस.टी नोंदणी पुरावा इ. कागदपत्रांच्या प्रती सादर करण्यात याव्यात.

३. पुरवठा धारकाने आपले दर सर्व करासह व वाहतूक खर्चासह पोहोच देण्यात यावे.

४. कोटेशन नोटीसमधील नमूद स्पेसिफिकेशनुसार सदर शाळेमध्ये वाद्य खरेदी साहित्याचा वाहतुकीसह पुरवठा स्वखर्चाने करावा लागेल.

५. पुरवठा आदेशानुसार दिलेल्या मुदतीत साहित्याचा पुरवठा न केलेस प्रतिदिनी रक्कम रुपये ५००/- विलंब शुल्क आकारणेत येवून त्याची देय बीलातून वसुली करणेत येईल.

६. मंजूर केलेले दर सदरची साहित्य खरेदी पूर्ण होईपर्यंत पुरवठाधरकावर बंधनकारक राहतील.

७. पुरवठा धारकास कोणत्याही प्रकारची भाववाढ / नुकसान भरपाई मिळणार नाही.

८. सिलबंद कोटेशन पाकिटावर नोटीस क्रमांक फर्म /कंपनीचे नावाचा स्पष्ट उल्लेख करावा.

९. उशिरा आलेल्या व अपुऱ्या तसेच अटीयुक्त कोटेशनचा विचार केला जाणार नाही.

१०. कोटेशन संपूर्ण प्रक्रियेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ) हे लवाद म्हणुन जो निर्णय देतील तो अंतिम राहील. जो उभयंतावर बंधनकारक राहील.

११. सदरचे काम हे प्राचार्य / मुख्याध्यापक यांच्या सूचनेनुसार करावयाचे आहे. त्यांच्या पोहोच चलनानुसार बील अदा करणेत येईल.

१२. कोणतेही कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ यांनी राखून ठेवला आहे.

१३. सदरची कोटेशन नोटीस संतपीठाचे www.santpithpcmc.com या अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

(विजयकुमार थोरात)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ